दुरध्वनी क्र.२८१९३०८७,
अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना)
यांचे कार्यालय, मिरा भाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.), ता.जि.ठाणे ४०११०१.
जा.क्र.माअधि/अपिल/६८/२०१९
O/C
दि.१९/०६/२०१९.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (१) अंतर्गत दाखल झालेले प्रथम अपील.**

श्री.आशिष किरण मेस्त्री, ............अपिलार्थी
बी/२०५, आनंद लक्ष्मी, उत्तन रोड, भाईंदर (प.),
ता.जि.ठाणे ४०११०१.

जनमाहिती अधिकारी तथा, ...............प्रतिवाद
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

## -: विवेचन :-

श्री.आशिष किरण मेस्त्री यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडे दि.११/०३/२०१९ रोजीच्या अर्जान्वये खालील माहिती मिळणेबाबत अर्ज सादर केला.

१) कामगारांचे पगार पुस्तक २) कामगारांचे हजेरी पुस्तक ३) ठेकेदाराने महिनानिहाय सादर केलेली बिले ४) महिनानिहाय बिल ऑफ स्टेटमेंट

**अपिल दाखल करण्याची कारणे:-**

माहिती अधिकार अंतर्गत अवलोकनासाठी दस्तऐवज व मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करून न देता मुळ नस्तीचे अवलोकन झाल्याबाबतचा पत्रात खोटा उल्लेख करुन दिशाभूल करुन अवलोकन प्रक्रिया टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या व अवलोकनासाठी मागणी केलेली कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करून न दिल्याने अपिलार्थी यांनी दि.२७/०५/२०१९ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपायुक्त (आस्थापना) यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.

**सुनावणीचा तपशिल:-**

अपिलार्थी व जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांना प्रथम अपिलाच्या सुनावणीस दि.१९/०६/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहणेबाबत जा.क्र.मिभामनपा/उपआ.आस्था/९८/२०१९ दि.१३/०६/२०१९ अन्वये कळविण्यात आले आहे.

सबब, जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग व अपिलार्थी अर्जदार व त्यांचे मदतनीस सुनावणीस उपस्थित आहेत.

Scanned by CamScanner

१) **अपिलार्थी यांचा सुनावणी दरम्यान युक्तिवाद**:- माझ्या दि.१६/०४/२०१९ रोजीच्या अर्जानुसार अवलोकनासाठी दस्तऐवज व मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करुन न देता मुळ नस्तीचे अवलोकन झाल्याबाबतचा पत्रात खोटा उल्लेख करुन दिशाभूल करुन अवलोकन प्रक्रिया टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या व अवलोकनासाठी मागणी केलेली कागदपत्रे अवलोकनासाठी उपलब्ध करुन दिली नाहीत.

२) **जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान केलेला युक्तिवाद:-** अपिलार्थी अर्जदार यांना दि.०७/०५/२०१९ रोजी मे.सैनिक इंटेलिजन्स एन्ड सिक्युरिटी प्रा.लि. ठेकेदाराची उपलब्ध मुळ नस्ती अवलोकन करणेसाठी उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी अर्जदार यांच्या दि.०७/०५/२०१९ रोजी लेखी पत्रानुसार उपलब्ध कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती शासकीय फी भरणा केल्यास देण्यात येईल असे दि.०८/०५/२०१९ रोजीच्या पत्राने कळविले असता अपिलार्थी अर्जदाराने शासकीय फी भरणा केलेली नाही. याव्यतिरिक्त अपेक्षित माहिती आस्थापना विभागात उपलब्ध नसल्याने लेखा विभागात असलेली देयके व त्या समवेत विभागप्रमुख यांनी प्रमाणित केलेली हजेरीपत्रके अवलोकन करणेबाबत निवडणूक कामी कर्मचारी व्यस्त असल्याने लेखा विभागामार्फत माहिती उपलब्ध होऊ शकलेली नाही. तरी दि.१३/०६/२०१९ रोजी लेखा विभागास अभिलेख अपिलार्थी अर्जदारास अवलोकनार्थ नस्ती उपलब्ध करुन देणेबाबत कळविले असुन अपिलार्थी अर्जदार यांना तारीख व वेळ देणेबाबत कळविले आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**-: निर्णय :-**

१) जनमाहिती अधिकारी तथा आस्थापना अधिक्षक (आस्थापना) यांनी जनमाहिती अधिकारी, लेखा विभाग यांना अभिलेख अवलोकनाकरिता दि.२६/०६/२०१९ रोजी अपिलार्थी अर्जदारास बोलाविणेसाठी लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे. वरील निर्देश देऊन अपिल निकाली काढण्यात येत आहे.

२) सदर आदेशाविरुध्द अपील करावयाचे असल्यास मा.राज्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, कोकण खंडपीठ, ५ वा मजला, दालन क्र.५२८, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४००६१४ यांच्याकडे सदर आदेशाच्या दिनांकापासून ९० दिवसांच्या आत अपील दाखल करता येईल.

**(दिपक पुजारी)**
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा**
**उपायुक्त (आस्थापना)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति:-**

१) श्री.आशिष किरण मेस्त्री,
१०१, श्री महाअष्टविनायक अपार्टमेन्ट,
विनायक धाम, अंबाडी रोड, वेवूर, पालघर (पूर्व),
ता.जि.पालघर.

Scanned by CamScanner

२) जन माहिती अधिकारी तथा
आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग

३) माहिती अधिकार अपिल नस्ती
प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपायुक्त (आस्थापना) यांचे कार्यालय.

पोच
२०/६/१९

Scanned by CamScanner